म.कौ.हि.सं.अर्ज क्र.६९/२०२४
नि.क्र.३४ लगत

<u>नि.क्र.१ वरील दिनांक ०७.१२.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे नि.क्र.३४ वर जाबदारचा उलटतपास अर्जदारमार्फत वकील श्री. ए.एम.पटेल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

हे म्हणणे खरे आहे की, कर्मवीर स्पर्धा परिक्षा प्रबोधिनी, इस्लामपूर येथे केवळ क्लासेस घेतले जातात. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्याकडे राहण्याची कोणतीही सोय नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांचे स्वतःचे वसतीगृह आहे. त्यांचे स्वतःचे वसतीगृह आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा या कामात सादर करणेस मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे स्वतःचे वसतीगृह आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी या कामी सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३१/१ कडील पत्रामध्ये कर्मवीर स्पर्धा परिक्षा प्रबोधिनी यांचे वसतीगृह असल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक २७.०५.२०२४ रोजी अर्जदार यांना नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस नि.क्र.३२/१ कडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस अर्जदार यांना मिळाली होती.

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.१२.२०२४ रोजी कर्मवीर स्पर्धा परिक्षा प्रबोधिनी येथे जावून मी तेथे दंगा केला व अर्जदारास शिवीगाळ केली. त्यामुळे, अर्जदार यांनी तेथील प्रवेश रद्द करुन सांगली येथे प्रवेश घेतला किंवा कसे याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही इस्लामपूर येथे राहण्यास असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदारास व्हॉट्सअपवर धमकीवजा संदेश पाठवित असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील संपुर्ण मजकूर खोटा नमूद केलेला आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.06.24 11:14:07 +0530

**(श्री. ओ. एस. शास्त्री)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र.५) सांगली.**
दि. २१.०६.२०२५

**समक्ष**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.06.24 11:14:15 +0530

**(श्री. ओ. एस. शास्त्री)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र.५) सांगली.**
दि.२१.०६.२०२५

स्वाक्षरीत/-

-------------------

साक्षीदार